# उत्तरसूची व गुणदानाबाबत सूचना
## इयत्ता : आठवी – विषय : मराठी (प्रथम भाषा)

| तोंडी | लेखी | एकूण गुण |
|---|---|---|
| १० | ५० | ६० |

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
|---|---|---|---|
| | **तोंडी चाचणी** | | |
| प्र. १) | **तुझ्या परिसरात साजऱ्या केल्या जाणाऱ्या कोणत्याही एका सणाबद्दल माहिती सांग.** | 08.01.01 | २ |
| | सणाचे नाव, सण कोणत्या महिन्यात साजरा केला जातो, सणाचे महत्त्व, सणाचे वैशिष्ट्य, सण साजरा करण्याची पद्धत इ. मुद्द्यांच्या अनुषंगाने समर्पक शब्दांत माहिती सांगणे अपेक्षित आहे.<br>• वरीलप्रमाणे विषयाची मांडणी केल्यास.<br>• विषयाची मांडणी मुद्देसूद नाही किंवा अडखळत बोलतो. | | <br><br>२<br>१ |
| प्र. २) | **खालील बातमी वाचून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** | 08.01.02 | ५ |
| | अ) समारंभाचे प्रमुख पाहुणे – श्री. अविनाश शिवतरे<br>आ) कला प्रदर्शनास प्रतिसाद देणारे – रसिक<br>इ) श्री. अविनाश शिवतरे<br>ई) बातमीमधील घटक –<br>१) चित्रकला शिबिर २) शिबिराचा समारोप ३) सप्रात्यक्षिक मनोगत ४) समारंभाचे अध्यक्षस्थान ५) आभार प्रदर्शन अशा समर्पक उत्तरास | | १<br>१<br>१<br>२ |
| प्र. ३) | **दिलेली कविता वाचून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची तोंडी उत्तरे दे.** | 08.01.03 | ३ |
| | अ) संगणक उत्तर येईल असा प्रश्न –<br>कवीच्या घरी काय आणणार आहेत? दूरच्या व्यक्तीचा चेहरा कोणामुळे दिसणार आहे? सुबक सुंदर चित्र कशामुळे काढता येईल? असे प्रश्न तयार केल्यास.<br>आ) संगणकाच्या मदतीने अचूक गणित करता येईल, देश-विदेशातील मित्र जोडले जातील, सुंदर सुबक चित्रे काढता येतील. अशा प्रकारची समर्पक उत्तरे दिल्यास. | | १<br><br><br>२ |
| | **लेखी चाचणी** | | |
| प्र. ४) | **खालील संवाद वाचून त्यावर आधारित दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** | 08.01.05 | ६ |
| | अ) वरील संवादात प्रत्यक्ष दोन व्यक्ती सहभागी आहेत.<br>आ) १) दीन : आजारी मुलाची दीन अवस्था पाहून आईचे डोळे भरून आले.<br>२) दिन : १५ ऑगस्ट हा दिवस आपण स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करतो.<br>इ) शब्दकोश, गुगल ॲप, शिक्षक, वर्गमित्र, विविध शैक्षणिक ॲप्स, युट्युब, विविध संदर्भ पुस्तके इ. अशा प्रकारचे समर्पक उत्तर दिल्यास. | | १<br>२<br><br>३ |

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
|---|---|---|---|
| प्र. ५) | **खालील उतारा वाचून त्यावर आधारित दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** | 08.01.08 | ६ |
| | अ) **(ब)** सोशिक व खिलाडू<br>आ) १) फुले : फुलांचे आयुष्य खूप कमी असते, पण तरीही ते आयुष्याविषयी आस्था दाखवितात. निसर्गात आनंदाने जगतात.<br>२) फुलपाखरे : फुलपाखरांचे आयुष्य काही दिवसांचे असते, पण जीवनाकडे ते सकारात्मक दृष्टीने पाहतात. निसर्गात आनंदाने जगतात. जीवनाचा रसास्वाद घेतात. यासारखे समर्पक उत्तर दिल्यास.<br>इ) • ३ ते ४ समर्पक वाक्ये लिहिल्यास.<br>• २ समर्पक वाक्ये लिहिल्यास.<br>• १ समर्पक वाक्य लिहिल्यास. | | १<br>२<br><br><br><br><br>३<br>२<br>१ |
| प्र. ६) | **सूचनेनुसार कृती कर.** | 08.01.09 | ५ |
| | अ) चौकीदार, मामलेदार, इनामदार यांसारखे शब्द लिहिल्यास<br>आ) जडत्व, पालकत्व, ममत्व यांसारखे शब्द लिहिल्यास<br>इ) अनवाणी<br>ई) पांग फेडणे. या वाक्प्रचारास १ गुण व समर्पक वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा. | | १<br>१<br>१<br>२ |
| प्र. ७) | **अ) दिलेल्या सूचनेनुसार उत्तरे लिही.** | 08.01.10 | ९ |
| | **अ) खालील कविता वाच व त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.**<br>१) अन्नजाल म्हणजे अन्नाची साखळी किंवा एक प्राणी इतर प्राण्यांना खाऊन जगणे किंवा एक प्राणी दुसऱ्या प्राण्यावर अवलंबून असणे.<br>२) कारण निसर्गाने अन्नजाल निर्माण केले परंतु, या प्रक्रियेत काही जीव जाती नष्ट झाल्यामुळे अन्नजाल क्षीण होत चालले आहे.<br>३) निसर्गातील पशुपक्षी, प्राणी यांचे जतन व संवर्धन करणे. मानवाने प्राण्यांची हत्या न करणे. प्राणी वाचून निसर्गाचा समतोल राखण्याचा प्रयत्न करणे. यांसारखे समर्पक उत्तर अपेक्षित.<br>**आ) तुमच्या शाळेत 'अपूर्व विज्ञान मेळावा' आयोजित केला आहे. त्याला भेट देण्यासाठी मित्राला पत्र लिही.**<br>पत्ता, दिनांक , मायना, मजकुरात शुद्धलेखनासह समर्पक मुद्देसूद मांडणी व योग्य समारोप केल्यास पूर्ण गुण देणे.<br>• पत्र पाठविणाऱ्याचा पत्ता, दिनांक, मायना<br>• विषयानुसार मजकूर व योग्य समारोप | | ६<br>२<br><br>२<br><br>२<br><br><br>३<br><br><br><br>१<br>२ |
| प्र. ८) | **खालील जाहिरातीचे वाचन करून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** | 08.01.12 | ४ |
| | अ) वरील जाहिरात पिसगावातील शालेय विद्यार्थ्यांसाठी आहे.<br>आ) पिसगावातील इयत्ता पहिली ते इयत्ता आठवीमधील विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद डिजिटल शाळेत प्रवेश घेणे.<br>इ) जाहिरात अधिक आकर्षक होण्यासाठी शाळेच्या फीचा उल्लेख करणे, शाळेचा भ्रमणध्वनी देणे, इतर विविध योजना अंतर्गत योजना कोणत्या याचा स्पष्ट उल्लेख असावा. यासारखी समर्पक व योग्य उत्तरे स्वीकारणे. | | १<br>१<br><br>२ |

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
|---|---|---|---|
| प्र. ९) | **दवाखान्यात येणाऱ्या रुग्णांसाठी सूचना देणारा कमीत कमी तीन सूचनांचा सूचनाफलक तयार कर.** | 08.01.13 | ३ |
| | विषयाला अनुसरून सूचना लेखन केल्यास प्रत्येक सूचनेस गुण द्यावेत.<br>• ४ ते ३ सूचना लिहिल्यास<br>• २ सूचना लिहिल्यास<br>• १ सूचना लिहिल्यास | | <br>३<br>२<br>१ |
| प्र. १०) | **खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे 'माझी आवडती कला' ( उदा. चित्र, संगीत, नाट्य, शिवण, गायन इ.) या विषयावर आठ ते दहा ओळींत निबंध लिही.** | 08.01.14 | ५ |
| | • ८ ते १० वाक्यात समर्पक असे लेखन केल्यास.<br>• ६ ते ८ वाक्ये लिहिल्यास<br>• ४ ते ६ वाक्ये लिहिल्यास<br>• किमान ३ वाक्ये लिहिल्यास<br>• किमान १ ते २ वाक्ये लिहिल्यास | | ५<br>४<br>३<br>२<br>१ |
| प्र. ११) | **'तू अनुभवलेली सहल' या विषयावर आठ ते दहा वाक्ये लिही.** | 08.01.15 | ५ |
| | विद्यार्थ्यांची समज, आकलन याचा विचार करावा.<br>लेखनातील आशयाचा विचार करावा.<br>लेखनात बोलीभाषेतील शब्दांचा उपयोग केल्यास ते स्वीकारावेत.<br>• किमान ८ ते १० वाक्ये लिहिल्यास<br>• किमान ६ ते ७ वाक्ये लिहिल्यास<br>• किमान ४ ते ५ वाक्ये लिहिल्यास<br>• किमान ३ वाक्ये लिहिल्यास<br>• किमान १ ते २ वाक्ये लिहिल्यास | | <br><br><br>५<br>४<br>३<br>२<br>१ |
| प्र. १२) | **सूचनेनुसार कृती कर.** | 08.01.18 | ७ |
| | अ) १) उपमा अलंकार<br>२) बारा अक्षरे<br>आ) अव्ययीभाव समास,<br>द्वंद्व समास<br>इ) वाचनीय<br>ई) भूतकाळ आणि भविष्यकाळ प्रत्येकी १ गुण द्यावे | | १<br>१<br>२<br><br>१<br>२ |